# महाराष्ट्र जीवन प्राधिकरण

सिडको भवन, दुसरा मजला, (द.क.)बेलापूर,नवी मुंबई -४०० ६१४.
दूरध्वनी : २७५७ १६७३, २७५७ ०१६६, २७५७ १६७७.
फॅक्स : २७५७ ०९६९, २७५७ १६६६.

क्र.मजीप्रा-२०१८/सभा-१४२/(२८)/आ.४/ दिनांक: १३.७.२०१८

प्रति,
मा.मंत्री, नगर विकास तथा प्राधिकरणाचे सह अध्यक्ष, मंत्रालय, मुंबई.
मा.मंत्री, ग्राम विकास तथा प्राधिकरणाचे सह अध्यक्ष, मंत्रालय, मुंबई.
मा.राज्यमंत्री, नगर विकास तथा प्राधि.चे उपाध्यक्ष, मंत्रालय, मुंबई.
मा.राज्यमंत्री, पा.पु. व स्वच्छता तथा प्राधि.चे उपाध्यक्ष, मंत्रालय, मुंबई.
अपर मुख्य सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
प्रधान सचिव (वित्तीय सुधारणा), वित्त विभाग, तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
प्रधान सचिव (उर्जा) उद्योग, उर्जा, कामगारविभाग, तथा प्राधि.चे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
प्रधान सचिव (२), नगर विकास विभाग, तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
सचिव, ग्राम विकास विभाग, तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई.

**विषय :** महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या संचालक मंडळाच्या दि.११ जुलै, २०१८ रोजी झालेल्या १४२ व्या बैठकीचे इतिवृत्त.

**महोदय,**

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या दि.११ जुलै, २०१८ रोजी झालेल्या १४२ व्या बैठकीचे इतिवृत्त आपल्या माहितीसाठी सोबत सादर करण्यात येत आहे.

२०/७/१८
निर्गमित

**आपला विश्वासू,**

**(अशोक मांडे)**
**मुख्य प्रशासकीय अधिकारी (प्र.)**

**प्रत :** खाजगीसचिव (मा.मंत्री, पा.पु. व स्व. तथा अध्यक्ष, मजीप्रा यांचे कार्यालय, मंत्रालय, मुंबई.
सोबतचे इतिवृत्त मा.मंत्री, पा.पु. व स्व. यांचे निदर्शनास आणावे ही विनंती.

**प्रत: माहितीसाठी व त्वरित कार्यवाहीसाठी.**
संचालक (वित्त) म.जी.प्रा. सिडको भवन, नवी मुंबई.
उपसचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई ४०००३२.
मुख्य अभियंता, म.जी.प्रा. प्रादेशिक विभाग, ठाणे/पुणे/नाशिक/औरंगाबाद/अमरावती/नागपूर.
अधीक्षकअभियंता,(मुख्यालय,)मजीप्रा,मुंबई.
उप मुख्य लेखाधिकारी (१ / २) म.जी.प्रा. सिडको भवन, नवी मुंबई.

आस्थापना अधिकारी (दक्षता) म.जी.प्रा. एक्सप्रेस टॉवर्स, मुंबई.

कायदा व कामगार अधिकारी, म.जी.प्रा. एक्सप्रेस टॉवर्स, मुंबई.

प्रशासकीय नि आस्थापना अधिकारी, म.जी.प्रा. सिडको भवन, नवी मुंबई.

सर्व कक्ष अधिकारी / कार्यासन अधिकारी (आस्थापना - ) म.जी.प्रा. मुंबई / सिडको भवन, नवी मुंबई.

सोबत इतिवृत्तातील आपल्या कार्यालयाशी संबंधीत कार्यक्रम बाबीवर त्वरित योग्य ती कार्यवाही करुन केलेल्या कार्यवाहीचा कार्यपुर्ती अहवाल १५ दिवसात मध्यवर्ती कार्यालयास सादर करावा.

| आस्थापना : | लेखा शाखा : |
| --- | --- |
| कक्ष अधि. आ.१ | रोख शाखा : 20-7-18 |
| आ.२ 20/7/18 | |
| आ.३ 20/7/18 | |
| आ.५ | |
| आ.६ 20/7/18 | |
| आ.८ | |

# महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या १४२ व्या सभेचे इतिवृत्त.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची १४२वी सभा मा.मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे पदसिध्द अध्यक्ष, मा.श्री.बबनराव लोणीकर यांचे अध्यक्षतेखाली बुधवार दिनांक ११ जुलै, २०१८ रोजी सकाळी १०.१५ वाजता नागपूर येथील शिबर कार्यालय कुटीर क्र.१५ येथील दालनात संपन्न झाली. या सभेस महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे खालील सदस्य उपस्थित होते.

१) मा.श्री.बबनराव लोणीकर, मंत्री, पा.पु. व स्वच्छता तथा प्राधिकरणाचे अध्यक्ष.
२) मा.श्री.शामलाल गोयल, अपर मुख्य सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा प्राधिकरणाचे सदस्य.
३) मा.श्री.पी. वेलरासू, सदस्य सचिव, म.जी.प्रा. तथा प्राधिकरणाचे सदस्य सचिव, मुंबई.

या व्यतिरिक्त सदर सभेस महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे खालील अधिकारी उपस्थित होते.

१) श्री.सुधाकर डांगे, संचालक (वित्त), म.जी.प्रा., सिडको भवन, नवी मुंबई.
२) श्री.एस.बी.भुजबळ, अधीक्षक अभियंता (मु.) म.जी.प्रा. मुंबई.
३) श्री.अशोक मांडे, मुख्य प्रशासकीय अधिकारी (प्र.) म.जी.प्रा. मुंबई.

सर्व प्रथम मा.सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, सिडको भवन, नवी मुंबई यांनी सर्व उपस्थितांचे स्वागत केले. त्यानंतर मा.मंत्री, पा.पु. व स्वच्छता तथा प्राधिकरणाचे अध्यक्ष, यांच्या परवानगीने सभेस सुरुवात करण्यात आली.

**कार्यक्रम बाब क्र.१ :** म.जी.प्रा. च्या १४१ व्या सभेच्या इतिवृत्तास मान्यता देणे.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या संचालक मंडळाची १४१ वी सभा दि.२७ मार्च, २०१८ रोजी संपन्न झाली. सदर सभेच्या इतिवृत्तास मान्यता प्रदान करण्याचा प्रस्ताव संचालक मंडळास सादर करण्यात आला व त्यास मान्यता प्रदान करण्याची विनंती सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांनी संचालक मंडळास केली.

इतिवृत्तावर चर्चा होऊन, १४१ व्या सभेच्या इतिवृत्तास संचालक मंडळाने मान्यता प्रदान केली.

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

11/07

**कार्यक्रम बाब क्र.२ :** म.जी.प्रा. च्या १४१ व्या सभेतील निर्णय प्रमाणे झालेल्या कार्यवाहीत मान्यता देणे.

म.जी.प्रा. च्या संचालक मंडळाची दि.२७ मार्च, २०१८ रोजी संपन्न झालेल्या १४१ व्या बैठकीमध्ये जे निर्णय घेण्यात आले, त्या निर्णयाच्या अनुषंगाने केलेल्या कार्यवाहीबाबत सदस्य सचिव, यांनी संचालक मंडळास अवगत केले. त्यानुसार १४१ व्या सभेपुढील बाबींवर करण्यात आलेल्या कार्यवाहीस मान्यता देण्यात आली.

**कार्यक्रम बाब क्र.३:** महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या कर्मचाऱ्यांच्या महागाई भत्यामध्ये वाढ करण्याबाबत.

सदर कार्यक्रम बाबीबाबत मा.सदस्य सचिव महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांनी संचालक मंडळास अवगत केले की, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या अधिकारी / कर्मचाऱ्यांना व सेवा निवृत्त कर्मचाऱ्यांना ऑक्टोंबर - २०१६ पासून मासिक वेतनामध्ये ११३% या दराने महागाई भत्ता देण्यात येत आहे. ऑक्टोबर २०१६ नंतर शासनाने वेळोवेळी महागाई भत्याच्या दरामध्ये वाढ केलेली आहे. सदर महागाई भत्याची वाढ महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या अधिकारी / कर्मचाऱ्यांना व सेवा निवृत्त कर्मचाऱ्यांना देण्यात आलेली नाही.

तथापी म.जी.प्रा. चे अधिकारी/ कर्मचारी व निवृत्त वेतन धारक यांना मासिक वेतनामध्ये ११३% वरुन १३९% वाढीव महागाई भत्ता माहे जुन २०१८ पासून चालू करण्याबाबत मा.सदस्य सचिव यांनी मा.अध्यक्ष यांना अवगत केले. सदर महागाई भत्ता १३९% प्रमाणे शासनाच्या मंजुरीचे अधिन राहून मंजूर करण्याबाबत अवगत केले. यासाठी होणारा खर्च सध्या म.जी.प्रा. चे महसूली खर्चातून भागविण्यात येणार असून शासनाकडून (पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग) सदर महागाई भत्ता १३९% प्रमाणेचा निधी प्राप्त झाल्यावर झालेल्या खर्चाचे समायोजन वित्त विभागामार्फत म.जी.प्रा.चे महसुली खर्चाच्या लेखाशिर्षात करण्यात येईल. तसेच यापुढेही प्रत्येक महिन्याचे वेतन १३९% प्रमाणे म.जी.प्रा.च्या कार्यरत व सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना देण्यात येईल व त्यासाठी होणारा खर्च मजीप्राचे महसूली खर्च लेखाशीर्षातून करण्यात येईल. शासनाकडून निधी प्राप्त झाल्यावर त्याचे समायोजन वित विभागाकडून महसूली लेख्यात करण्यात येईल.

यासाठी मजीप्राचे अधिकारी/ कर्मचारी व निवृत्त वेतन धारक यांना ११३% वरुन १३९% वाढीव महागाई भत्ता चालू केल्यास प्रतिमहिना नियमित कर्मचारी यांना रु.१.७२ कोटी व

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

निवृत्ती वेतनधारक वेतन धारकांना रु.१.८१ कोटी असे एकूण रु.३.५३ कोटी एवढ्या निधीची प्रती महिना आवश्यकता आहे.

ठराव :

असा ठराव करण्यात येतो की, शासन निर्णय क्र.मभवा-१११५/प्र.क्र.४२/सेवा-९/ दि.१५.१०.२०१' नुसार १०७% वरून ११३% महागाई भत्ता करण्यात आला असून तो मजीप्राच्या कर्मचाऱ्यांना ऑक्टोबर २०१६ पासून देणे सुरु आहे. आता शासन निर्णय क्र.मभवा-२०१७ /प्र.क्र.११/सेवा-९/ दि.२८.२.२०१८ अन्वये माहे जुलै २०१७ पासून १३६% वरुन १३९% दराने शासकीय कर्मचाऱ्यांना लागू केला आहे. तो म.जी.प्रा.तील कार्यरत कर्मचारी व सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना माहे जून २०१८ पासून लागू करण्यास संचालक मंडळाने मान्यता दिली आहे. सदर महागाई भत्ता १३९% प्रमाणे शासनाच्या मंजूरीचे अधिन राहून मंजूर करण्यास मान्यता देण्यात येत आहे. यासाठी होणारा खर्च सध्या म.जी.प्रा.च्या महसुलीत खर्चातून भागविण्याचे प्रस्तावित असून शासनाकडून (पाणी पुरवठा व स्वच्छता) सदर महागाई भत्ता १३९% प्रमाणेचा निधी प्राप्त झाल्यावर, झालेल्या खर्चाचे समायोजन मजीप्राचे वित्त विभागामार्फत महसुली खर्चाच्या लेखाशिर्षात करण्यात येईल. तसेच यापुढेही प्रत्येक महिन्याचे वेतन १३९% प्रमाणे महागाई भत्यासह म.जी.प्रा.चे कार्यरत व सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना देण्यात येईल त्यासाठी होणारा खर्च मजीप्राचे महसुली खर्च लेखाशीर्षातून करण्यात येऊन शासनाकडून निधी प्राप्त झाल्यावर त्याचे समायोजन महसुली लेख्यात करण्यात येईल.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे उपलब्ध असलेला निधी व प्राप्त होणाऱ्या महसुलातून माहे जुन देय जुलै - २०१८ या महिन्यात अदा करण्यास मान्यता देण्यात येत आहे. तसेच यापुढे राज्य शासनाकडून वेळोवेळी मंजूर होणाऱ्या महागाई भत्याच्या वाढीप्रमाणे म.जी.प्रा.चे कर्मचाऱ्यांना महागाई भत्ता अदा करण्यास संचालक मंडळाने मान्यता दिली असून यापुढे महागाई भत्यासाठी संचालक मंडळाची स्वतंत्र मान्यता घेण्याची आवश्यकता नसलेबाबत संचालक मंडळाने मान्यता दिलेली आहे. यासाठी सदस्य सचिव यांना प्राधिकृत करण्यांत येत आहे. तसेच सदर महागाई भत्याचे मागील फरकाबाबत संचालक मंडळाचे बैठकीमध्ये स्वतंत्र पणे निर्णय घेण्यात येईल असे ठरले.

या अनुषंगाने पुढील कार्यवाही करण्यासाठी प्राधिकरणाचे सदस्य सचिव, म.जी.प्रा. यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

कार्यक्रम बाब क्र.४: महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातील वाहन चालक संवर्गातील मंजुर परंतु रिक्त असलेल्या पदांशी संबंधित कामे बाहय यंत्रणेकडून (आऊट सोर्सिगव्दारे) करुन घेणेबाबत..

या बाबत मा.सदस्य सचिव, म.जी.प्रा. यांनी संचालक मंडळास अवगत केले की, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामध्ये वेळोवेळी शासन स्तरावरुन करण्यात आलेल्या पद निर्मिती दरम्यान वाहन चालक संवर्गाची पदे निर्माण करण्यात आलेली आहेत. त्याचप्रमाणे प्राधिकरणाच्या संचालक मंडळाच्या दिनांक २६ मे, २००४ रोजी झालेल्या ९७ व्या बैठकीतील कार्यक्रम बाब क्र.८ अन्वये महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातील वाहनांच्या वापरासंबंधीचे धोरण निश्चित करण्यात आले. म.जी.प्रा.मधील उपलब्ध शासकीय वाहने, वाहनचालकांची मंजूर पदे, उपलब्ध वाहन चालक तसेच पुढील वर्षभरात याबाबतचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| वाहन चालक संवर्गाची मंजूर पदे | उपलब्ध शासकीय वाहने | उपलब्ध वाहन चालक | अनुज्ञेय व सुस्थितीतील वाहनांसाठी सद्यस्थितीत आवश्यक वाहन चालक | दि.३०.६.१९ पर्यंत सेवानिवृत्त होणारे वाहन चालक | पुढील एक वर्षात आवश्यक वाहन चालक |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४(२-३) | ५ | ६(४+५) |
| **२००** | **७०** | **६७** | **०३** | **१६** | **१९** |

२. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या आस्थापनेवरील गट क व गट ड मधील पद भरती सन २००० पर्यंतच करण्यात आलेली आहे. महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन परिपत्रक दि.१ मार्च, २००० अन्वये राज्यशासनाने पद भरतीवर बंदी घातली होती. सदर शासन निर्णयाच्या अनुषंगाने महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे आदेश दि.८ मार्च, २००० अन्वये प्राधिकरणातील पद भरतीवर देखील निर्बंध लागू केले आहेत. प्राधिकरणाचे परिपत्रक दि.१० जुलै,२०१५ अन्वये सदर पद भरतीवरील निर्बंध सद्यस्थितीतही कायम आहेत.

३. प्राधिकरणातील पदांच्या आकृतीबंधाचा प्रस्ताव शासन स्तरावर पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाकडे पाठविण्यात आलेला आहे. सदर आकृतीबंध अद्यापपर्यंत अंतिम झालेला नसल्याने वाहन चालक संवर्गातील रिक्त पदे भरणेबाबतची कार्यवाही करता येत नाही. सबब, प्राधिकरणातील ज्या कार्यालयामध्ये वाहन अनुज्ञेय असणाऱ्या अधिकाऱ्यांकडे

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

शासकीय वाहन उपलब्ध आहे परंतु वाहन चालक उपलब्ध नाही , अशा ठिकाणी वाहन चालक पदाची कामे बाहय यंत्रणेव्दारे (आऊट सोर्सिग) करणे आवश्यक आहे.

४. शासन परिपत्रक, वित्त विभाग दि.२ ऑगस्ट, २०१६ मधील परिच्छेद ३(अ) मध्ये नमुद केल्यानुसार बाहय यंत्रणेव्दारे पुरविण्यात येणाऱ्या कुशल पदांमध्ये "वाहनचालक" पदाचा समावेश करण्यात आलेला आहे.

५. शासन परिपत्रक, वित्त विभाग दि.२ डिसेंबर, २०१३ मध्ये नमुद केल्यानुसार शासकीय कार्यालयातील कामे बाहय यंत्रणेकडून केल्यानंतर होणाऱ्या खर्चातील अंदाजित बचतीचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| पदनाम आणि आकृतीबंध नुसार मंजुर पदे | मंजुर पदांपैकी नियमित नियुक्तीने भरलेली पदे | मंजुर पदांपैकी बाहय यंत्रणेव्दारे भरलेली पदे (तुलने करिता एक पद विचारात घेतले आहे ) | रकाना क्र.३ येथील पदे नियमित रितीने भरली असतील तर नवनियुक्त वाहनचालकाच्या वेतनावरील व भत्त्यावरील अंदाजे खर्च (रु.) | | रकाना क्र. ३ येथील पद बाहय यंत्रणेव्दारे भरल्याने त्यावर येणारा अंदाजित खर्च (रु.) | | बाहय यंत्रणेव्दारे काम केल्याने होणाऱ्या बचतीची टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | | ५ | | ६ |
| | | | मासिक | वार्षिक | मासिक | वार्षिक | |
| वाहन चालक | | | | | | | |
| २०० | ६७ | १ | २४५०० | २,९४,००० | १८,००० | २,१६,००० | २६ टक्के |
| वाहन चालकाची नियमित आस्थापनेवर नियुक्ती केल्यास संबंधित कर्मचाऱ्यास वार्षिक वेतनवाढ तसेच वैद्यकीय देयक प्रतीपूर्ती ठरते. त्याचप्रमाणे ७ वा वेतन आयोग लागू झाल्यानंतर वेतनामध्ये अधिक फरक पडेल. याचा विचार करता बाहययंत्रणेकडून कामे करुन घेतल्यास शासकीय खर्चात बचत होईल. | | | | | | | |

६. सबब शासन परिपत्रक, वित्त विभाग दि.२ फेब्रुवारी २०१३, २ डिसेंबर २०१३ व २ ऑगस्ट २०१६ मध्ये बाहय यंत्रणेकडून काम करुन घेण्याबाबत मार्गदर्शक सुचना निर्गमित केलेल्या आहेत. प्राधिकरणातील पदांचा आढावा अंतिम होऊन वाहनचालक संवर्गातील पदाची भरती प्रक्रिया सुरु होईपर्यंत महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातील ज्या कार्यालयामध्ये वाहन अनुज्ञेय असलेल्या अधिकाऱ्याकडे सुस्थितीतील शासकीय वाहन उपलब्ध आहे, परंतु वाहनचालक उपलब्ध नाही, अशा कार्यालयातील वाहनचालकाची कामे बाहय यंत्रणेव्दारे

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पुं. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

करुन घेणेस मान्यता देण्याची बाब प्रस्तावित करण्यात येत आहे. सदर कार्यवाही करणेकरीता सदस्य सचिव यांना अधिकार प्रदान करण्यांस मान्यता देण्याचे प्रस्तावित आहे.

ठराव :

ठराव करण्यांत येतो की, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामध्ये गट-क मध्ये नमुद संवर्गातील पदे भरण्यांस सन २००० पासून निर्बंध घालण्यात आलेले असून सदय:स्थितीतही सदर निर्बंध कायम ठेवण्यांत आलेले आहेत. प्राधिकरणातील पदांचा आढावा अंतिम होऊन वाहनचालक संवर्गातील पदाची भरती प्रक्रिया सुरु होईपर्यत प्राधिकरणातील ज्या कार्यालयामध्ये वाहन अनुज्ञेय असलेल्या अधिकाऱ्याकडे सुस्थितीतील शासकीय वाहन उपलब्ध आहे, परंतु वाहनचालक उपलब्ध नाही, अशा कार्यालयातील वाहनचालकाची कामे बाहय यंत्रणेव्दारे करुन घेणे करीता सदस्य सचिव यांना अधिकार प्रदान करण्यांत येत आहेत. शासनाच्या वित्त विभागाने बाहय यंत्रणेकडून काम करुन घेण्याबाबत वेळोवेळी दिलेल्या मार्गदर्शक सुचनांचे पालन करुन सदर कार्यवाही करण्यांत यावी.

याबाबत सदस्य सचिव यांनी पुढील कार्यवाही करावी.

याप्रमाणे सदरच्या बैठकीमध्ये ठेवलेल्या कार्यक्रम बाबींवर चर्चा होवून सभा संपल्याचे जाहिर करण्यात आले.

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा